
ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)

REVIEW OF RESEARCH

VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# भारतातील मुसलमान समाजाची संस्थात्मक वाटचाल (१८५७ ते १८८५) : एक अभ्यास



**डॉ.तुकाराम नारायण शिंदे**
**इतिहास विभाग , अे.आर.बुर्ला महिला महाविदयालय,सोलापूर.**

## प्रस्तावना:

ब्रिटीश राजवटीमधील मुसलमानांची वाटचाल ही स्वतंत्र इस्लाम राज्य स्थापन होण्याच्या दृष्टीने महत्वाची ठरली.मुसलमानाकडूनच ब्रिटीशांनी भारतातील सत्ता हाती घेतली होती. ब्रिटीशकाळातच मुसलमानांनी पुन्हा भारतात मुसलमानांची सत्ता स्थापन करण्याचा इ.स. १८५७ च्या उठावाच्या निमित्ताने प्रयत्न केला होता.पण ब्रिटीशांनी मुसलमानांचा प्रयत्न हाणून पाडला आणि मुसलमान समाजाचा भारतातील ब्रिटीश राजवटीला असलेला गंभीर धोका ओळखून मुसलमानांना जवळ केले. मुसलमानांनी याचा फायदा घेत भारतात मुसलमानाचे राज्य स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरु केला होता. या प्रयत्नातूनच त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या होत्या.या संस्थापैकी देवबंद संस्था वेगळी होती. तरीही इतर मुस्लिम संस्थाबरोबर या ही संस्थेचा प्रस्तुत शोधनिंबधात आढावा घेतला आहे.

## १८५७ चा उठाव व भारतीय राजकारणाला नवी दिशा

१८५७ चा उठाव भारतातील ब्रिटीश सत्ता,मुसलमान व हिन्दुच्या राजकारणाला नवी दिशा देणारा ठरला होता.इ.स. १८५७ चा उठाव हा मुसलमानांचा उठाव होता. मुसलमानांचे म्हणजेच इस्लाम राज्य स्थापन करण्यासाठीच उठाव करण्यात आला होता. प्रारंभी ब्रिटीश शासनावर असंतुष्ट असणाऱ्या भोळया भाबडया हिन्दु शिपायांनी उठावात भाग घेतला पण एकूण हिन्दु समाज शासनाच्या बाजूने होता. शीख,रजपूत व मराठे यांनी हा उठाव मोडून काढण्यासाठी ब्रिटीशांना मदतच केली होती.[१] ब्रिटीशांनी मुसलमानांनाच या उठावास जबाबदार धरले होते.यामुळेच ब्रिटीशांनी उठाव मोडून काढल्यानंतर मुसलमानांना कठोर शिक्षा दिल्या.दिल्ली व लखनौ येथे मोठया संख्येने मुसलमानांना ठार केले. मुस्लिम कवींनी याबाबत आक्रोश केला.इतिहासकार प्रा. फ्रॅन्सिस रॉबिन्सन यांच्यामते, “ मुस्लिम समाज हाच भारतातील ब्रिटीश राज्याला पुढील काळात भयानक धोका असल्याचे मानले गेले.[२] त्याचबरोबर इ.स.१८७० मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड मेयो यांनी , “काय, भारतीय मुसलमान त्यांच्या धर्माज्ञनेप्रमाणे राणी सरकारविरुध्द बंड करण्यास बांधले गेले आहेत ? या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक सदस्यीय हंटर आयोग नेमला होता. या हंटर आयोगाने या प्रश्नाचे उत्तर होकारत्मक दिले.त्याचबरोबर मुसलमान प्रजाननाकडून (कोणत्याही बिगर मुस्लिम राज्याला) प्रामाणिक राजनिष्ठेची अपेक्षा करता येणार नाही असा निष्कर्ष मांडला.त्याचबरोबर मुसलमानांना बंडखोर ठरवून त्यांचीशी कठोर संघर्ष करुन शांततेने राज्य करता येणार नाही. तर त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करावा लागेल, त्यांच्यात सुधारणा कराव्या लागतील तसेच त्यांना सवलती दयाव्या लागतील अशी शिफारस केली. भारतातील ब्रिटीश सरकारने हंटर आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या. तसेच हंटरआयोग पुढील काळात द इंडियन मुसलमान्स या नावाने ग्रंथरुपाने प्रसिध्द झाला. हा ग्रंथ ब्रिटीशांच्या धोरणातील परिवर्तन बिंदू (turning point) ठरला.यामुळे ब्रिटीशांच्या मुस्लिम धोरणाने १८० अंशाने वळण घेतले आणि त्यांनी मुसलमानांना खूष व हिन्दुना निरुत्साही करण्याचे धोरण अवलंबिले.[३] ब्रिटीशांचे हे धोरण फोडा व राज्य करा या धोरणाऐवजी समतोल साधा व राज्य करा (Balance and rule) असे होते.[४] या काळात ब्रिटीशांच्या या धोरणाला उचलून धरणारे सर सय्यद अहमद खानसारखे नेते पुढे आले.या बदललेल्या परिस्थीतीमुळे भारतातील मुसलमानांना नवी ऊर्जा मिळाली. या ऊर्जेच्या आधारेच मुस्लिमांच्या अनेक संघटना उदयास आल्या व त्यांनी इस्लाम राज्य स्थापन करण्याचे ध्येय वेगवेगळया मार्गाने साध्य करण्यासाठी प्रयत्न सुरु केले.अशा संस्थांची माहिती खालीलप्रमाणे-

## मुसलमानांची संस्थात्मक वाटचाल

१८५७ च्या उठावाचा मुस्लिम समाजावर मोठा आघात झाला होता. सर सय्यद अहमद खान यांनी मुसलमान समाजाला या आघातातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवला. त्यांच्या या प्रयत्नातूनच मुसलमानांचे अलगतावादाचे धोरण जन्मास आले होते.त्याचबरोबर ज्यांनी १८५७ च्या उठावाचे नेतृत्व केले होते अश उलेमांनी ब्रिटीशनिष्ठ न राहता ब्रिटीशविरोध चालू ठेवला आणि मुसलमानांचे राज्य स्थापन करण्याचे ध्येय बाळगले. या सर्व पार्श्वभूमीवर मुसलमान समाजाची संस्थात्मक वाटचाल पाहावी लागते.

## १. शामली येथील इस्लामिक राज्य

इ.स. १८५७ च्या उठावातील वलिउल्लाही उलेमा हे शाह वलिउल्लाह यांच्या वलि उल्लाही (वहाबी नव्हे) परपंरेतील उलेमा होते. १८५७ च्या उठावानंतरही ते ब्रिटीशांच्या भारताला दार-उल-हरब म्हणजेच शत्रूभूमी मानत होते.[५] याच परंपरेतील उलेमांनी ब्रिटीश काळात शामली येथे आदर्श इस्लामी राज्य स्थापन केले होते.[६] मौलवी हाजी इमादुल्लाह यांना खलिफा नेमण्यात आले होते. मौलवी मुहंमद कासीम नानौनवी सरसेनापती तर मौ.रसीद अहमद गंगोही हे काझी/न्यायमूर्ती बनले होते.शामली येथील मौलवींनी मुसलमान राज्य स्थापन करणे या ध्येयप्राप्तीसाठी, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी हिंसेचा मार्ग अवलंबिला होता.तसेच व्यक्तिचा जिहादी म्हणून उपयोग केला होता.

## २. देवबंद चळवळ

वलिउल्लाही परंपरेतूनच देवबंद चळवळ उदयास आली होती. देवबंद येथे दार-उल-उलम या इस्लामी विदयापीठाची स्थापना झाली होती.हेच ठिकाण देवबंद चळवळीचे जन्मस्थान होते. मुहंमद कासीम व मौ. रसीद अहमद यांनी इ.स.१८६७ मध्ये देवबंद येथे शिक्षण संस्था स्थापन केली होती.[७]

देवबंद हे उत्तर प्रदेशातील मुज्जफरनगर जिल्हयातील व दिल्लीपासून ११० कि.मी. अंतरावर असलेले शहर आहे. देवबंद शिक्षण संस्थेला नावलौलिक मिळवून देण्यात मौ.मुहंमद कासीम नानौतवी यांचा सिंहाचा वाटा होता. ते मार्गदर्शक प्रेरणास्थान होते.[८] शामली व देवबंदचे अभ्यासक प्रा. फारुकी यांच्यामते, “ शामली व देवबंद या वस्तुतः एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ध्येयसिध्दीसाठी कोणते साधन वापरावे याबाबत फक्त फरक होता.” पूर्वीची तलवार व भाले यांची जागा इ.स. १८६७ मध्ये लेखणी व वाणी यांनी घेतली होती.देवबंद येथे स्वातंत्र्यासाठी व्यक्ति निर्माण करण्याचे कार्य हाती घेण्यात आले होते.[९]

देवबंदच्या दार-उल-उलुम ची स्थापना ही मोठी ऐतिहासिक घटना होती. देवबंदच्या दार-उल-उलुमच्या विचारातून देवबंद चळवळ निर्माण झाली होती.भारतीय स्वातंत्र्यलढयातील इ.स. १८८५ ते १९४७ या काळातील मुस्लिम समाज अलिगड चळवळ व देवबंद चळवळीत विभागला होता. देवबंद चळवळीचे नेते उलेमा,मौलवी व धर्मपंडित हे परपंरावादी धर्मनिष्ठ विचाराचे होते. धर्मशिक्षण देऊन सच्चे मुसलमान बनविण्याचे उद्दिष्ट त्यांच्यासमोर होते. त्यांना इस्लामनिष्ठ बनवून ब्रिटीशद्रोही बनवायचे होते. इस्लाम राज्य स्थापन करण्यासाठी प्राणर्पण करणारे धर्मयोध्दे निर्माण करावयाचे होते. १८५७ च्या उठावातील अनेक योध्दे देवबंद विदयापीठात अध्यापक होते.[१०]

देवबंद धर्मपंडिताचा सर्वसामान्य मुस्लिम समाजावर खूप प्रभाव होता. देवबंद चळवळीचे नेते मध्यमवर्ग व सर्वसामान्य जनतेला जवळचे वाटणारे होते. याकाळात देवबंद हे इस्लामी पुनरुज्जीवन चळवळीचे केंद्र बनले होते.

## अलिगड चळवळ

इ.स. १८७५ मध्ये सर सय्यद अहमदखान यांनी अलिगड येथे मोहमडन अँग्लो ओरिएंटल कॉलेज स्थापन केले होते. येथे निर्माण झालेल्या चळवळीला अलिगड चळवळ असे नाव पडले.मुस्लिम समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी हे कॉलेज महत्वाचे ठरले. या कॉलेजमधूनच पुढील काळात विदयापीठ स्थापन झाले. येथूनच इंग्रजी शिक्षण घेतलेली मुस्लिम तरुणांची एक पिढी निर्माण झाली होती. त्यामधून नव्या दृष्टीचे राजकीय नेते निर्माण झाले. त्यांनी राजकीय संघटना व पक्ष स्थापन केले. त्यातूनच अलिगड चळवळ सुरु झाली होती. अलिगड चळवळीतील नेते सामान्यतः उच्च कुळातील व आर्थिकदृष्टया उच्च वर्गातील होते. त्यामधील अनेक जण नवाब,जमीनदार,सरंजामदार व जहागिरदार होते.सर सय्यद अहमद खान हे अलिगड चळवळीचे पहिले नेते तर बॅ.जिना हे शेवटचे नेते होते. यादरम्यानच्या काळात अनेक नेत्यांनी अलिगड चळवळ बळकट व सामर्थ्यवान बनविण्यासाठी परिश्रम घेतले. त्यामध्ये आगाखान यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. ते स्वतंत्र व सार्वभौम पाकिस्तान हे अलिगड विदयापीठातून जन्म पावले.[११] असे अभिमानाने सांगत असत.अलिगड चळवळ अलगतावाद,द्विराष्ट्रवाद व फाळणीच्या बाजूने होती. त्याचबरोबर ब्रिटीशनिष्ठ,स्वातंत्र्याविरोधी, काँग्रेस हिन्दुविरोधी होती. अलिगड चळवळीमधूनच मुस्लिम लिग हा राजकीय पक्ष जन्मास आला होता.पुढे मुस्लिम लिग व बॅ.जिना यांच्या प्रयत्नाने पाकिस्तान निर्माण झाला. तेव्हा अलिगड भारतात राहिले पण येथील कित्येक प्राध्यापक व विदयार्थी पाकिस्तानात गेले.[१२]

## द सेंट्रल नॅशनल महोमेडन असोशिएशन

भारतात सर सय्यद अहमद खान यांच्याप्रमाणेच अनेक मुस्लिम नेते होते. सय्यद अमीर अली हे त्यापैकीच एक होते. ते उच्च व इंग्रजी शिक्षीत होते. भारतात मुस्लिम लिगच्याही अगोदर मुस्लिमांची स्वतंत्र राजकीय संघटना स्थापन करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.[१३] पाश्चात्त्य शिक्षण इस्लामविरोधी नसल्यामुळे ते मुसलमांनानी घेतले पाहिजे.हिन्दु हे आपले खरे प्रतिस्पर्धी असून त्यांना विरोध केला पाहिजे आणि ब्रिटीश शासनाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे. अशी त्यांची विचारसरणी होती. या विचारसरणीतूनच त्यांनी इ.स.१८७७ मध्ये कलकत्ता येथे द सेंट्रल नॅशनल महोमेडन असोशिएशन ही स्वतंत्र मुस्लिम राजकीय संघटना स्थापन केली होती.इ.स. १८८८ पर्यंत या संघटनेच्या ५३ शाखा भारतात स्थापन झाल्या होत्या.मुस्लिमांचे प्रश्न हिन्दुपेक्षा वेगळे आहेत अशी स्पष्ट भूमिका या संघटनेची होती.याचदरम्यान त्यांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी सर्व भारतीयांकरिता स्थापन केलेल्या इंडियन असोशिएशन या संघटनेत जाण्यास नकार दिला होता.त्याचबरोबर त्यांनी इ.स. १८८६ च्या कलकत्ता येथील कॉंग्रेस अधिवेशनाचे निमंत्रण नाकारले होते.

या संघटनेचे संस्थापक अमीर अली यांनी मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र आहे अशी द्विराष्ट्रवादाची पायाभूत कल्पना इ.स.१९०९ मध्ये मांडली होती. त्याचबरोबर त्यांनी मुस्लिम समाजाला कॉंग्रेसपासून अलिप्त राहण्याचा आणि नंतर मुस्लिम व्यापाऱ्यांना महात्मा गांधीच्या जाळयात न फसण्याचा सल्ला दिला होता.[१४] त्याचबरोबर बंगालमधील मुस्लिमांनी बंगाली शिकू नये असा प्रचार केला होता.

## सारांश

इ.स. १८५७ ते १८८५ याकाळात ब्रिटीश- मुसलमान व मुसलमान -हिन्दु यांच्या संबधाने वेगळे वळण घेतले होते. मुसलमान भारतात पुन्हा इस्लाम सत्ता स्थापन करण्याच्या प्रयत्नात होते. भारतातील हिन्दुनी हे तात्काळ ओळखले होते.याचदरम्यान स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेमुळे मुस्लिमांच्या या प्रयत्नांना आळा बसला.यामुळेच त्यांनी राष्ट्रीय सभेची हिन्दुची संघटना आहे अशी संभावना केली होती. या सर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुस्लिमांचा अलगतावाद आणि भारताची फाळणी यावर अधिक प्रकाश टाकणे शक्य आहे.

## तळटिपा


१. अखंड भारत का नाकारला? , शेषराव मोरे, राजहंस प्रकाशन,पुणे,पृष्ठ क्रं.१९
२. Sepaaratism amang Indian muslims-Francis Roinson,OUP (१९९३) page No.१००
३. Bengal Divided : The unmaking of a nation (१९०५ ते १९७१) Nitish Sengupta , Penguin, Viking(२००७) page No.६
४. The Muslims of india-P.Hardy, Combridge Univ.Press, ND(२००२) page No.८९
५. History of Freedom Movement in India,Vol.२ Tara Chand publications division ,Govt. of India,ND(१९९०) Page No.३८४
६. शेषराव मोरे पृष्ठ क्रं.९४
७. उपरोक्त
८. The Deoband School and The Devband for Pakistan-Zia-ul-Hasan Faruqi, Asia pub,House, Bombay (१९६३) page No.४२
९. तत्रैव पृष्ठ क्रं.२३
१०. मौलाना आझाद,डॉ.अलीम वकील,प्रतिमा प्रकाशन,पुणे (२००५) पृष्ठ क्रं.३४३
११. Pakistan : Its Origin and Relations with India - V.B. Kulkarni Sterling pub.pvt ltd. ND (१९९०) page No.३१
१२. The Indian Muslims-M. Mujeeb, Munshiram Mohanlal pub.pvt.ltd.ND (२००३) page No.६६
१३. शेषराव मोर पृष्ठ क्रं.६७
१४. Gandhi and The Break-up of India-Rafiq Zakaria, Bharatiya vidya Bhavan,Mumbai(१९९९) page No.३२